ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Re. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २१ पुणें, बुधवार तारीख ४ जुलै, १९५६ अंक २७

## विविध माहिती

**पूर्व पाकिस्तानांतील धरण**—पूर्व पाकिस्तानांत ६·८ कोटी डॉलर्स खर्च येणारें एक धरण बांधण्यांत येणार आहे. धरणासाठीं लागणारे बांधकामाचे नमुने आणि तें बांधण्याची पद्धत ह्याविषयीं सल्लामसलत देण्याचा करार पाकिस्तान सरकार आणि इंटरनॅशनल को-ऑपरेशन ॲडमिनिस्ट्रेशन ही संघटना ह्यांच्यांत झाला आहे.

**कलकत्त्यामधील गलिच्छ वस्त्या**—कलकत्ता शहरांतील गलिच्छ वस्त्यांतून ७ लाख लोक रहात आहेत. ह्या वस्त्या नाहींशा करून तेथील लोकांची राहण्याची सोय करण्यासाठी भारतीय सरकारच्या घरबांधणी खात्यानें मदत देऊं केलेली आहे. पश्चिम बंगाल सरकारनें ही मदत स्वीकारण्याचें ठरविलें आहे. कलकत्त्यांत अशा प्रकारच्या ८,००० वस्त्या असून प्रत्येकींत ३० ते ४० झोपड्या आहेत.

**पोलादाचे कारखाने**—युरोप व ब्रिटन ह्या देशांतील पोलादाचे कारखाने पहाण्यासाठी भारतीय प्रतिनिधी मंडळ तिकडे रवाना झालें आहे. जर्मनींत जाऊन रूरकेला येथील पोलादाच्या कारखान्याच्या तपशिलाची व ब्रिटनला जाऊन दुर्गापूर येथील कारखान्याच्या तपशिलाची चर्चा प्रतिनिधी मंडळ करणार आहे.

**साखरेच्या खास गाड्या**—मद्रास राज्यांतील शहरांतून साखरेच्या किंमती व्यापाऱ्यांच्या सौदेबाजीमुळें वाढल्याचें समजतें. किंमती वाढूं न देण्यासाठी उत्तर प्रदेशांतील साखर भरून ५ खास आगगाड्या लवकरच राज्यांतून जातील. प्रत्येक गाडींत १,००० ते १,२०० टन साखर असेल. ती मार्गांतील मोठ्या शहरांतून वाटण्यांत येईल.

**चीनची कांबोडिआला मदत**—चीन व कांबोडिआ ह्या राष्ट्रांच्या दरम्यान आर्थिक मदतीचा करार करण्यांत आला आहे. करारांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं १९५६ व १९५७ सालांत चीननें कांबोडिआला ८० लाख पौंड आर्थिक साह्य द्यावें. कांबोडिआनें ही रकम चीनला परत करावयाची नाहीं असेंहि ठरलें आहे. कांबोडिआचा औद्योगिक विकास करण्यासाठीं ती वापरण्यांत येणार आहे.

**अधिक शुद्ध युरेनिअम**—जपानच्या सरकारी तांत्रिक बोर्डानें असें जाहीर केलें आहे कीं विजेचा उपयोग करून अधिक शुद्ध युरेनिअम तयार करण्याची नवीन पद्धत शोधून काढण्यांत आली आहे. ही पद्धत इतर राष्ट्रें वापरीत असलेल्या पद्धतीपेक्षा स्वस्त आहे, असेंहि सांगण्यांत येत आहे. प्रयोगांत २·२ पौंड युरेनिअम तयार करण्यास २ पौंड खर्च आला.

**लुंगीच्या कापडाला मागणी**—अमेरिकेंतील एका कापडाच्या व्यापाऱ्यानें मद्रासकडील लुंगीचें कापड घेण्याची मोठी मागणी नोंदविली आहे. १,४०,००० वार कापडाची मागणी करण्यांत आली असून त्यापैकीं निम्में कापड रवानाहि झालें आहे. लवकरच आणखी १० लाख वार कापडाला मागणी येण्याचा संभव आहे.

**पोलादाच्या मोबदल्यांत चहा**—भारतामधील नाना प्रकारच्या विकास-योजनांना लागणारें पोलाद देऊन त्याचा मोबदला म्हणून रशिआ भारताकडून कांहीं प्रमाणांत चहा घेणार आहे. रशिआनें भारताकडून २० लाख पौंड चहा घेण्याचा करार केला आहे. हा व्यवहार कलकत्ता येथील व्यापाऱ्यांच्या मार्फत होणार आहे. ह्याशिवाय १॥ ते २ कोटी पौंड चहा रशिआ पुढें घेईल.

**वीज कंपन्यांचें राष्ट्रीयीकरण**—ऑल इंडिया फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिसिटी एम्प्लॉईज् ह्या संस्थेची पहिली परिषद बंगलोर येथें भरली होती. देशांतील सर्व विजेच्या कंपन्यांचें आणि विशेषतः कलकत्त्याच्या कंपनीचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें अशी मागणी परिषदेनें केली आहे. ठरावाचा रोख मुख्यतः परकीय भांडवलाच्या कंपन्यांच्या विरुद्ध आहे.

**ब्रह्मदेश-जपान व्यापारी करार**—ब्रह्मदेश आणि जपान ह्या देशांनीं परस्परांत ऐनजिनसी बदलाचा व्यापारी करार केला आहे. कराराच्या शर्तीप्रमाणें ब्रह्मदेश जपानकडून ४२० लाख रुपये किंमतीपर्यंत सुती कापड आणि सूत घेणार आहे आणि त्याचा मोबदला म्हणून अमेरिकेनें पुरविलेला कच्चा कापूस देणार आहे.

**राजदूतांची वसाहत**—दिल्ली येथें परदेशांच्या राजनैतिक प्रतिनिधींसाठी जी वसाहत स्थापन करण्यांत आली आहे तिनें ९०० एकर जागा व्यापली आहे. ह्या जागेंत एकूण २६२ प्लॉट्स् पाडण्यांत आले आहेत. त्यांपैकीं २६ जागा परदेशांनीं विकत घेतल्या आहेत. कांहीं देशांनीं त्यावर आपल्यासाठीं इमारतीहि बांधल्या आहेत. एक प्लॉट हॉटेल स्थापन करण्यासाठी विकत घेण्यांत आला आहे.

**पेनिसिलीनची आयात**—भारतांत गेल्या ऑगस्ट महिन्यापासून पेनिसिलीनच्या उत्पादनास प्रारंभ झालेला आहे. तरी सुद्धां ह्या औषधाची आयात वाढत्या प्रमाणावर होत आहे. गेल्या आर्थिक वर्षाच्या ११ महिन्यांत भारतानें १॥ कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीचें पेनिसिलीन आयात केलें. १९५४-५५ सालांत १,४७,६९,७९५ रुपये किंमतीचें पेनिसिलीन आयात करण्यांत आलें होतें.

**आंध्र राज्यांतील छोटीं बंदरें**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत आंध्र राज्यांतील छोट्या बंदरांची सुधारणा करण्याचें कार्य हातीं घेण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी भारतीय सरकारनें २८·१ लाख रुपये मंजूर केल्याचें जाहीर करण्यांत आलें आहे.

**बाजवी पैशांत औषधोपचार**—सिकंदराबादच्या मेयरनें शहरांत एका दवाखान्याचें उद्घाटन केलें. ह्या दवाखान्यांतून लोकांना खरेदीच्या किंमतीला औषधें देण्यांत येतील. त्याचप्रमाणें उपचारासाठी द्यावयास लागणारे पैसेहि बाजवी असतील. अशा प्रकारचा उपक्रम शहरांत प्रथमच होत आहे.

**मद्रास पोर्ट ट्रस्टचे नौकर**—मद्रास पोर्ट ट्रस्टच्या नौकरांसाठी वसाहत स्थापण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें असून त्यासाठी ३६ लाख रुपये मंजूर केले आहेत. वसाहतीसाठी ४० एकर जागा मिळविण्यांत आली आहे. ५०० बिऱ्हाडांची सोय करण्यांत येणार आहे.

**हैदराबाद येथें नवा ध्वनिक्षेपक**—हैदराबाद नभोवाणी केंद्रावर १० किलोवॅट शक्तीचा नवा ध्वनिक्षेपक पुढील मार्चपूर्वी बसविण्यांत येणार आहे. ह्या ध्वनिक्षेपकामुळें सर्व आंध्र राज्यांत कार्यक्रम चांगले ऐकूं जातील. त्याशिवाय विजयवाडा ह्या ठिकाणींहि २० किलोवॅट शक्तीचा आणखी एक ध्वनिक्षेपक चालू करण्यांत येणार आहे.

**रेशमाचे कारखाने उघडले**—बंगलोर येथील यंत्रमागाचे रेशमाचे कारखाने १४ मे पासून बंद होते. कामगारांचे प्रतिनिधी व कारखान्यांचे मालक ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें २ जुलैपासून ते पुन्हा चालू झाले. औद्योगिक तंट्यामुळें सुमारें १,५०० कामगार बेकार झाले होते.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २.

## भागीदार व ठेवीदार यांच्या माहितीकरितां

कंपनीचे कर्तबगार मॅनेजिंग एजंट कै. चंद्रशेखर गोविंद आगाशे यांच्या निधनाविषयीं दुःख प्रदर्शित करणारीं व त्यांच्यावरील आणि सिंडिकेटवरील निष्ठा दाखविणारीं शेंकडों पत्रें आमच्याकडे आलीं आहेत.

## संचालक मंडळ कै. आगाशे यांचें कार्य धैर्यानें व अधिक जोमानें पुढें चालवीत आहे.

कंपनीच्या श्रीपूर येथील कारखान्यांत अनुभविक अधिकारी वर्ग असून तिकडील देखरेखीचें कार्य कंपनीचे एक संचालक व पंढरपूर म्युनिसिपालिटीचे लोकप्रिय अध्यक्ष, श्री. भगवान गणेश भाडुले, बी. एस्सी., एल्एल्. बी., वकील, हे करीत आहेत.

पुण्याच्या कार्यालयांत कर्तव्यनिष्ठ अधिकारी वर्ग आहे. तेथील कार्यासाठीं संचालक मंडळानें ॲड्मिनिस्ट्रेटिव्ह समिति नेमली असून तींतील सभासद व श्री. चेअरमन हे ऑफिसांत येऊन जातीनें कामें पाहतात.

कै. आगाशे यांच्याबरोबर वकिली करीत असलेले, मोर संस्थानचे माजी मंत्री श्री. शंकर लक्ष्मण लिमये, बी. एस्सी., एल्एल्. बी., हे एक वरील समितींत सभासद असून, ते पुण्याच्या कचेरींत तूर्त कांहीं दिवस पूर्ण वेळ काम करणार आहेत.

## ★ मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात. ☆

### ठेवींच्या व्याजाचे दर

| | |
|---|---|
| मुदत एक वर्ष | व्याज ६ ( सहा ) टक्के |
| मुदत तीन वर्षें | व्याज ७ ( सात ) टक्के |
| मुदत पांच वर्षें | व्याज ७॥ ( साडेसात ) टक्के |

९८० सदाशिव पेठ,
लक्ष्मीपथ, पुणें २.
दि. २१ जून १९५६

जगन्नाथ महाराज पंडित
चेअरमन,
दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि.

# अर्थ

बुधवार, ता. ४ जुलै, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रशिआच्या आर्थिक स्पर्धेची विवंचना

लंडनमध्यें सध्यां ब्रिटिश कॉमनवेल्थमध्यें सामील असलेल्या राष्ट्रांच्या मुख्य प्रधानांची परिषद् चालू आहे. ह्या परिषदेंतील मुख्य चर्चा राजकीय प्रश्नासंबंधीं असेल हें उघडच आहे. पण कांहीं राजकीय निरीक्षकांनीं असा अंदाज केला आहे कीं, गेल्या दोन तीन वर्षांत रशिआच्या धोरणांत जो बदल दिसून येत आहे, त्याच्या आर्थिक परिणामाचीहि चर्चा परिषदेंत होण्याचा संभव आहे. रशिआच्या सध्यांच्या राज्यकर्त्यांनीं पाश्चिमात्य राष्ट्रांशीं स्नेहानें वागण्याची व शांतता राखण्याची आपली इच्छा वारंवार प्रगट केली आहे. ब्रिटनचे मुख्य प्रधान मि. अँथनी ईडन ह्यांची रशिआच्या वेगानें वाढणाऱ्या उत्पादनाबद्दल चांगलीच खात्री पटलेली आहे. उत्पादनाच्या बाबतींत अमेरिकेची बरोबरी करावी; इतकेंच नव्हे, तर शक्य तितक्या लवकरच पुढेंहि जावें म्हणून रशिआ जोराचे प्रयत्न करीत आहे. रशिअन कम्युनिस्ट पक्षाचे चिटणीस मि. क्रुश्चेव्ह ह्यांनीं, रशिआ लवकरच अमेरिकेपेक्षा अधिक श्रीमंत होईल असें जाहीर उद्गारहि काढले आहेत. रशिआच्या ह्या स्पर्धेला कसें तोंड द्यावें ह्यासंबंधीं परिषदेंत चर्चा करण्यांत येईल असें दिसतें. गेल्या कांहीं वर्षांत अणुशस्त्रांची वाढ झाल्यानें मामुली स्वरूपाचीं शस्त्रास्त्रें जुनींपुराणीं गणलीं जाऊं लागलीं आहेत. रशिआनें अशा शस्त्रास्त्रांची निर्मिति कमी केल्याच्याहि वार्ता आहेत. ह्या जुन्या शस्त्रास्त्रावर होणारा खर्च व तीं उत्पादन करणारीं माणसें दुसऱ्या उत्पादक कामावर लावतां आल्यास रशिअन स्पर्धेला तोंड देणें शक्य होईल, अशी एक विचारसरणी आहे. सध्या कॉमनवेल्थ गटांतील बऱ्याच राष्ट्रांना चलनवृद्धीला तोंड द्यावें लागत आहे. आर्थिक स्थैर्य उत्पन्न करण्याच्या दृष्टीनें त्यांना वरील विचार आकर्षक वाटेल.

## औद्योगिक अपघातांच्या संख्येंत वाढ

औद्योगिक कारखान्यांतून कार्यक्षमता वाढण्यासाठी कामगारांना अपाय होऊं न देण्याच्या तरतुदींची गरज सर्वमान्य झालेली आहे. भारताचें औद्योगीकरण झपाट्यानें करण्यांत येत असल्यामुळें तर हा प्रश्न अधिकच महत्त्वाचा झाला आहे. तथापि गेल्या दहा वर्षांत कारखान्यांतून होणाऱ्या अपघातांचें प्रमाण दुप्पट झाल्याचें आढळून आलें असून, भारतीय सरकारच्या ह्या बाबतच्या प्रमुख सल्लागारानें त्याबद्दल आश्चर्य व्यक्त केलें आहे. अपघातांच्या कारणांकडे लक्ष देऊन ते टाळण्याचे बाबतींत मालकवर्ग व कामगारवर्ग हे दोघेहि सारखेच उदासीन असल्याचेंहि समजतें. हा प्रकार तर अधिकच आश्चर्यकारक वाटतो. गेल्या दहा वर्षांच्या कालांत कामगारांच्या संरक्षणाची व्यवस्था अधिक कडक करण्यांत येत असतांना, यंत्रें वापरण्याचा सराव वाढत असतांना आणि कामगार-संघ आपल्या हक्कांविषयीं दक्ष असतांना जायबंदी करणारे अपघात कारखान्यांतून अधिक प्रमाणांत व्हावेत हें चमत्कारिक वाटण्यासारखें आहे. एखादा कामगार काम करीत असतांना जायबंदी झाला तर त्याला नुकसानभरपाई देण्याचें बंधन मालकावर असतें. कामगार दगावला तरीहि त्याच्या वारसांना नुकसानभरपाई द्यावीच लागते. कामगारांच्या संरक्षणाची जरूर ती व्यवस्था करण्याच्या बाबतींत मालकवर्ग फारसा तत्पर असल्याचें आढळून येत नाहीं. कामगारांना नुकसानभरपाई देण्यांत मालकाला फारशी तोशीस पडत नसावी, असें अनुमान करतां येण्यासारखें आहे. उलटपक्षीं, संरक्षण-व्यवस्था काटेकोरपणें पाळण्याचें शिक्षण कामगार-संघाकडून कामगारांना नीटसें दिलें जात नसावें, असेंहि म्हणण्यास जागा आहे. तें कांहींहि असलें तरी अपघातांची संख्या मात्र वाढली आहे.

## खतें अधिक वापरण्याचा सल्ला

भारतीय सरकारचे शेतकी-मंत्री श्री. पंजाबराव देशमुख ह्यांनीं शेतकऱ्यांना अधिक प्रमाणांत खतें वापरण्याची विनंती केली आहे. खतांच्या वापरांत वाढ करण्यासाठीं सरकारनें जी मोहीम हातीं घेतली आहे, तिचें उद्घाटन ते करीत होते. श्री. देशमुख म्हणाले कीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताची लोकसंख्या ४१ कोटी होईल असा अंदाज आहे. ह्या वाढलेल्या लोकांना अन्नाचा व इतर खाद्यपदार्थांचा पुरवठा करण्यासाठीं उत्पादनाचीं लक्ष्यें पुढीलप्रमाणें ठरविण्यांत आलीं आहेत. अन्नधान्याचें उत्पादन १ कोटी टन झालें पाहिजे, तेलबियांचें उत्पादन १५ लाख टन झालें पाहिजे आणि उसाचें उत्पादन १·९ कोटी टन झालें पाहिजे. इतकें उत्पादन झालें तर सध्या दरमाणशीं दररोज जितके खाद्यपदार्थ मिळतात त्यापेक्षा थोडे अधिक मिळूं शकतील. उत्पादनाचीं हीं लक्ष्यें गांठण्यासाठीं खतांचा वापर अधिक प्रमाणांत करण्यांत आला पाहिजे. दुसऱ्या योजनेच्या कालांत पाटबंधाऱ्याचें पाणी निश्चितपणें मिळूं शकणारी जमीन ९ कोटी एकरांच्या घरांत जाईल. दर एकराला १०० पौंड सल्फेट ऑफ अमोनिआ लागतो असें धरल्यास हें खत ३० लाख टन लागेल. सध्या भारतांत अवघ्या ६ लाख टनांचा खप होतो. ह्याच एवढ्या खताचा विचार केला तर १९६०-६१ सालापर्यंत सुमारें १८॥ लाख टन खताचा वापर करण्याचें उद्दिष्ट आपण डोळ्यांसमोर ठेवलें पाहिजे. खताचा उपयोग करण्यामुळें कसा फायदा होतो तें शेतकऱ्याला समजावून सांगितलें पाहिजे आणि योग्य वेळीं जरूर तितकें खत त्याला मिळेल अशी व्यवस्थाहि करण्यांत आली पाहिजे. त्याचप्रमाणें, रासायनिक खतावरच केवळ अवलंबून न राहतां शेतांतील खड्ड्यांत तयार करण्यांत आलेल्या खताचाहि उपयोग करण्यास त्याला प्रवृत्त केलें पाहिजे.

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनची स्थापना

दि लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ॲक्ट १ जुलै, १९५६ रोजीं अंमलांत येईल. प्रत्यक्ष कॉर्पोरेशनची स्थापना ऑगस्ट किंवा सप्टेंबरमध्यें केली जाईल. कायद्याच्या ३ ऱ्या कलमाप्रमाणें "जाहीर केलेल्या" दिवशीं कॉर्पोरेशनची स्थापना व्हावयाची आहे.

### चीनशीं वाढत्या व्यापाराची तरफदारी

दुसऱ्या महायुद्धांत विस्कटलेली आर्थिक घडी जपाननें आतां बरीच सावरली आहे. त्यामुळें जपान युद्धापूर्वी ज्या देशांत माल निर्यात करीत असे त्या देशांच्या बाजारपेठेची त्याला अधिकाधिक गरज भासूं लागली आहे. जपानचे व्यापारमंत्री मि. इशिबाशी ह्यांनीं ह्या विषयासंबंधी एक लेख लिहून पर्यायानें जपानी सरकारचीं मतेंच मांडलीं आहेत. आपल्या लेखांत ते म्हणतात कीं, दुसऱ्या महायुद्धापूर्वी जपानच्या एकूण निर्यातीपैकीं एक चतुर्थांश निर्यात चीनमधील बाजारपेठेंत होत असे. चीनशीं असलेले व्यापारी संबंध पुन्हां चालू करण्याविषयीं जपानमधील बऱ्याच धंदेवाल्यांनीं आग्रह चालविला आहे. ह्या आग्रहाकडे दुर्लक्ष करणें जपानच्या सरकारला शक्य होणार नाहीं. ह्या बाबतींत आणखीहि एका गोष्टीचा विचार करावा लागत आहे. बऱ्याच पाश्चिमात्य राष्ट्रांनीं जपानच्या व्यापाराकडे सापत्नभावानें पहाण्याचें ठरविलें आहे. अमेरिकेंत तर जपानी मालावर बहिष्कार टाकण्यासंबंधीं उघड प्रचारच चालू आहे. ह्या घटनांचा जपानी लोकमतावर परिणाम होणें अपरिहार्यच आहे. पेकिंगमधील चिनी सरकारशीं वाढत्या प्रमाणावर व्यापार करण्याच्या मागणीला जपानमध्यें जोराचा पाठिंबा मिळूं लागला आहे; आणि त्यामुळें जपानी सरकारची परिस्थिति अवघड झालेली आहे. जपाननें चीनशीं वाढता व्यापार सुरू करण्यानें कम्युनिस्ट राष्ट्रगटाला राजकीय सहानुभूति दाखविल्यासारखें होईल असें मानण्याचें कारण नाहीं. चीनच्या सरकारनें आर्थिक व सांस्कृतिक संबंधाचा उपयोग करून जपानमध्यें कम्युनिझमचा प्रसार करण्याचा प्रयत्न करूं नये. अशी शंका घेण्यासहि त्यानें जागा देऊं नये.

---

### शेतावरील कामासाठीं गुरांचाच अधिक उपयोग

इंदूरपासून १९ मैलांवर असलेल्या महू ह्या ठिकाणीं पशुवैद्यकाचें व गुरांच्या पैदाशीचें शिक्षण देणारें कॉलेज आहे. कॉलेजसाठी वसतिगृह बांधण्यांत येत आहे. वसतिगृहाच्या पायाचा दगड बसविण्याचा समारंभ भारतीय सरकारचे अन्न व शेतकीमंत्री श्री. अजितप्रसाद जैन ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. जैन म्हणाले कीं, भारतामधील शेतीच्या व्यवसायांत यंत्रचलित नांगरांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करणें अजून बराच काळ शक्य होणार नाहीं. तोंपर्यंत शेतावरील काम करण्यासाठीं गुरांचाच उपयोग करावा लागणार आहे. अर्थातच गुरांचा दर्जा सुधारण्याची फार आवश्यकता आहे. गुरांची अवलाद सुधारण्यासाठी त्यांची निर्मिति, त्यांचा आहार आणि त्यांची जोपासना ह्या सर्वच बाबतींत आपणास शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारला पाहिजे. शेतावर कराव्या लागणाऱ्या मेहनतीच्या कामासाठी आज तरी मुख्यतः गुरांच्या शक्तीचाच उपयोग करण्यांत येत आहे; पण आपलीं गुरें निकृष्ट दर्जाचीं आहेत, कारण त्यांची मुख्यतः पैदास वाटेल तशी होत आहे आणि त्यांच्या खाण्याची नीटशी व्यवस्था नाहीं. आपल्या देशांत गुरांचें खाद्य पिकविण्यासाठी कांहीं तरी पद्धत अवलंबिणें लवकरच जरूरीचें होईल. त्याचप्रमाणें देशांतील शेती आणि गुरांची पैदास ह्यांची संघटना आधुनिक शास्त्रीय पद्धतीनें होणें आवश्यक आहे. पण अशा प्रकारच्या संघटनेचे प्रयत्न होण्यासाठी प्रथम पशुवैद्यकींत निष्णात असलेल्या तज्ज्ञांची फार गरज आहे. गुरें ही राष्ट्रीय संपत्ति आहे. पण सध्याच्या गोशाळा पाहिल्या म्हणजे त्या गोशाळा नसून गुरांचे कोंडवाडे आहेत असें वाटल्यावाचून रहात नाहीं.

उद्बोधक उद्गार

### आर्थिक विकासाला दोनशें वर्षे हवींत !

"भारतानें गेल्या पांच वर्षांत जी प्रगति केली आहे ती पुढील पांच वर्षेंहि चालू राहील, अशींच सर्व लक्षणें दिसत आहेत. थोड्याशा पंचवार्षिक योजना भारताला पुरेशा पडणार नाहींत; त्याच्या आर्थिक विकासाला एकशें-दोनशें वर्षे लागतील. सरकारनें त्यास हातभार लावला नाहीं, तर उद्दिष्टें गाठण्याची आशा बाळगणें कठीण होईल.":—इंटरनॅशनल बँकेचें शिष्टमंडळ सध्या भारतांत दौरा करीत आहे, त्याचे नेते, 'न्यूयॉर्क टाइम्स'ला दिलेल्या मुलाखतींत.

---

### जंजिरा बँक लि., जंजिरा-मुरूड

जंजिरा बँक लि. ला रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स देण्यास नकार दिला आहे. १९४३ सालीं स्थापन झालेली ही बँक असून १९५४ अखेर तिचें वसूल भांडवल ४·२२ लक्ष रु. होतें व १·०४ लक्ष रु. चा रिझर्व्ह फंड होता. एकूण ठेवी १·१६ लक्ष रु. च्या होत्या. एकूण ६·३१ लक्ष रु. कर्जाऊ दिलेले होते.

---

### रशियन-हिंदी शब्दकोश

साहित्य अकादमीनें एक मोठा रशियन-हिंदी शब्दकोश प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. ह्या शब्दकोशांत ५०,००० शब्द असून तो १,००० पृष्ठांचा होईल.

---

### त्रावणकोर-कोचीनमधील बँकिंग

त्रावणकोर-कोचीन बँकिंग चौकशी कमिटीचें चौकशीचें काम संपलें असून, ती आतां अहवाल लिहिण्यांत गुंतली आहे. कमिटीच्या शिफारशींवर, त्या राज्यांतील ११८ बँकांचें भवितव्य अवलंबून आहे. त्यांतील बहुतेक बँका आकारानें लहान असून, त्यांना बँकिंग कंपन्यांच्या कायद्यांतील तरतुदी जाचक होतात.

---

### कस्तुरबा ट्रस्टच्या अध्यक्ष

कस्तुरबा गांधी नॅशनल मेमोरिअल ट्रस्टनें श्री. प्रमिला विठ्ठलदास ठाकरसी ह्यांची ट्रस्टच्या अध्यक्षपदीं निवडणूक केली आहे. श्री. रामेश्वरी नेहरू ह्या उपाध्यक्ष झाल्या. ह्यापूर्वी कै. दादासाहेब मावळंकर ट्रस्टचे अध्यक्ष होते. ट्रस्टनें आतांपर्यंत ग्रामीण विभागांतील स्त्रिया व मुलें ह्यांच्या उद्धाराप्रीत्यर्थ गेल्या दहा वर्षांत ९५ लक्ष रु. खर्च केले आहेत.

---

### 'आनंद'चा सुवर्णमहोत्सव

१९०६ सालीं कै. वासुदेव गोविंद आपटे यांनीं सुरू केलेल्या 'आनंद' या लहान मुलांच्या मासिकाचा सुवर्णमहोत्सव न्या. मू. गजेंद्रगडकर यांचे अध्यक्षतेखालीं ता. १ जुलै रोजीं पुण्यांत साजरा करण्यांत आला.

महाराष्ट्रांत जी नांवलौकिक पावलेली लेखक मंडळी आहेत, त्यांपैकी कित्येकांना पुढें आणून आनंदानें एक महत्त्वाचें कार्य केलें आहे. बालवाङ्मयांतील 'आनंदा'ची कर्तबगारी अत्यंत मौलिक आहे, यांत वाद नाहीं. भावी महाराष्ट्राच्या आणि भारताच्या बालजगासाठी ह्याहिपेक्षा प्रभावी कार्य करण्यास 'आनंद'ला आणि त्यांच्या विद्वान् संपादक-चालकांस दीर्घायुष्य लाभो, असें आम्ही इच्छितों.

### 'पुरुषार्थ' खास आत्मकथा-अंक, मे १९५६

संपादकः—पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर

'पुरुषार्थ' मासिकाच्या संपादकांनीं हा खास आत्मकथा अंक प्रसिद्ध करून मराठींतील वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयांत एक उत्तम प्रकारची भर टाकली आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रांत कमी-जास्त यशस्वी झालेल्या महाराष्ट्रांतील अनेक ख्यातनाम सद्गृहस्थांनीं आपापल्या आयुष्यांत आपणास कसें यशस्वी होता आलें याचें जें वर्णन केलें आहे, तें त्यांच्याच भाषेंत वाचणें मोठें मनोरंजक आहे. कै. दादासाहेब मावळंकर, गजानन स्वामी बोरकर, श्रीमंत सरदार माधवराव किबे, रा. ब. सी. के. बोले, डॉ. ना. भा. खरे, म. म. चित्रावशास्त्री, शाहीर गोविंदस्वामी आफळे, सौ. आनंदीबाई शिर्के, शं. वा. किर्लोस्कर, रियासतकार सरदेसाई व गोळवलकर गुरुजी, अशीं सहज चाळताचाळता नजरेस आलेलीं कांहीं नांवें वाचलीं तरी त्यावरून आत्मकथा-संग्रह कसा प्रातिनिधिक स्वरूपाचा आहे हें आपणास दिसून येईल. निवेदित केलेल्या या आत्मकथांचें बारकाईनें निरीक्षण केलें तर आयुष्यांत यशस्वी होणें ही गोष्ट 'बुद्धिमत्ता, उद्योग व प्रासंगिक दैवानुकूल परिस्थिति' यांवर किती अवलंबून आहे हें आपल्या ठळकपणें नजरेस येतें. लघुकथा वा कादंबरीपेक्षाहि कांहीं आगळाच चटकदारपणा या संग्रहाला आला आहे. अनपेक्षित प्रसंग, संकटांवर आत्मकथानायकांनीं केलेली मात व त्यांचीं जीवनांतील मूल्यें यांचीं वर्णनें वाचतांना लेखकाबरोबर त्याचें जीवन आपण स्वतः जगतों कीं काय असें क्षणभर वाटूं लागतें. या कथनांची भाषा कधीं सुश्लिष्ट आहे तर कधीं ओघवती व सुबोध आहे तर क्वचित् ती नाट्यमय आहे. भाषेच्या ओघावरून लेखकाच्या स्वभावावर सहजगत्या पडलेला प्रकाशाचा झोत मोठा प्रेक्षणीय आहे. महाराष्ट्राच्या गेल्या पंचवीस-तीस वर्षांच्या सामाजिक, राजकीय व वाङ्मयीन जीवनाच्या विविध छटांचें मोठें सुंदर मिश्रण आपणांस या लेखनांतून दृष्टीस पडतें. उत्तम कादंबरी वा लघुकथांपेक्षाहि अनेक दृष्टींनीं आकर्षक व तरुण पिढीला आपल्या जीवनांत कांहीं स्थायी मूल्यें निर्माण करण्यास प्रोत्साहन देणारा हा स्फूर्तिदायक व वैशिष्ट्यपूर्ण खास आत्मकथा अंक काढण्याचे परिश्रम घेतल्याबद्दल आम्हीं संपादकांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

---

### जकात चुकविण्याची नवी युक्ति

मुंबई बंदरांत साबरमती बोट लागली, तेव्हां एक मोठें चित्तवेधक दृश्य दिसलें. बोटीवर, कराचीच्या एका उतारूला उतरवून घेण्यासाठी मुंबईचा मित्र आला, तेव्हां उतारूनें त्याला मिठी मारली आणि त्याच्या डोक्यावर आपली फेज टोपी मोठ्या प्रेमानें दाबून बसविली! उतारू कस्टम्सच्या तपासणीसाठी गेला आणि त्याचा मुंबईंतील मित्र शांतपणें बाहेर पडूं लागला. कस्टम्सच्या एका अधिकाऱ्यानें बोटीवरील प्रकार पाहिला होता; तेव्हां त्यानें फेझ टोपी तपासण्यासाठी मागून घेतली. त्या टोपींत ३,००० रु. किंमतीचें ३० तोळे सोनें आंतून बसविलेलें होतें. कराचीहून आलेल्या उतारूला थांबवून धरण्यांत आलें.

### शेड्यूल्ड आणि बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या

| | शेड्यूल्ड बँका | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्टेट बँक | एक्स्चेंज बँका | इतर शेड्यूल्ड बँका | एकूण | बिगर शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| **हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश** | | | | | | |
| १९३८ | ३५८ | ९३ | ६७७ | १,१२८ | ३४३ | १,४७१ |
| १९३९ | ३८१ | ९९ | ७९८ | १,२७८ | ६७३ | १,९५१ |
| १९४० | ३९० | १०१ | ८६० | १,३५१ | ८११ | २,१६२ |
| १९४१ | ४०१ | ९९ | ९५४ | १,४५७ | १,०१४ | २,४६८ |
| **अखंड भारत** | | | | | | |
| १९४२ | ३९२ | ८२ | ९७४ | १,४४८ | १,२६० | २,७०८ |
| १९४३ | ३९८ | ८४ | १,४०० | १,८८२ | १,५३१ | ३,४१३ |
| १९४४ | ४१९ | ७९ | १,९७७ | २,४७५ | १,९८५ | ४,४६० |
| १९४५ | ४३६ | ७७ | २,४५४ | २,९७१ | २,३७८ | ५,३३५ |
| **स्वतंत्र भारत** | | | | | | |
| १९४६ | ३५८ | ५८ | २,४४१ | २,८५७ | २,०२९ | ४,८८६ |
| १९४७ | ३६२ | ६० | २,५६५ | २,९८७ | १,८३२ | ४,८१९ |
| १९४८ | ३६७ | ६२ | २,५३४ | २,९६३ | १,७११ | ४,६७४ |
| १९४९ | ३७७ | ६४ | २,४११ | २,८५२ | १,५८९ | ४,४४१ |
| १९५० | ३८२ | ६२ | २,३३५ | २,७७९ | १,५७४ | ४,३५३ |
| १९५१ | ३९१ | ६३ | २,२१३ | २,६६७ | १,४७३ | ४,१४० |
| १९५२ | ४०८ | ६३ | २,२२१ | २,६९२ | १,३६९ | ४,०६१ |
| १९५३ | ४२२ | ६५ | २,२०४ | २,६९१ | १,३५१ | ४,०४२ |
| १९५४ | ४५३ | ६५ | २,२४९ | २,७६७ | १,२८६ | ४,०५३ |
| १९५५ | ४६१ | ६६ | २,३१२ | २,८५९ | १,२५८ | ४,११७ |

### टाटा कंपनीला जागतिक बँकेचें कर्ज

जागतिक बँक आणि टाटा आयर्न अँड स्टील, कंपनी ह्यांचें-मध्यें लवकरच एका करारावर सह्या होतील. ह्या करारान्वयें, जागतिक बँक ७.५ कोटी डॉलर्सचें कर्ज कंपनीला देईल. कंपनीचें पोलादाचें वार्षिक उत्पादन १० लक्ष टन आहे, तें २० लक्ष टन करण्यासाठी उत्पादनक्षमता वाढवावी लागेल. त्याकरितां आयात कराव्या लागणाऱ्या यंत्रसामुग्रीला परदेशीय चलन हें कर्ज प्राप्त करून देईल. कर्जावर कंपनी ४३⁄४% व्याज देईल; ११ वार्षिक हप्त्यांत कर्जफेड केली जाईल आणि पहिला हप्ता १९५९-६० मध्यें द्यावा लागेल. जागतिक बँकेनें आतांपर्यंत कोणत्याहि बिन-सरकारी संस्थेला एवढें मोठें कर्ज दिलेलें नाहीं. प्रस्तुत कर्जफेडीची भारत सरकारनें हमी घेतली आहे.

**सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या**—त्रावणकोर-कोचीन राज्याच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या पहिल्या वर्षांत सुमारें ८,००० सुशिक्षित बेकारांना नोकऱ्या देण्याची व्यवस्था करण्यांत येईल. पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालावधींत एकूण १,६०,००० नोकऱ्या उपलब्ध होतील, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

तमाम दंतरोगांवर
नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर

## नवा हिंदु वारसा कायदा

हा कायदा सर्व हिंदूंना लागूं होईल. या कायद्यांतील व्याख्येप्रमाणें 'हिंदु' या संज्ञेंत हिंदु, बौद्ध, जैन आणि शीख धर्मीय; तसेंच मुस्लीम, ख्रिश्चन, पार्शी आणि ज्यू धर्मीय वगळून उरलेले इतर सर्व, यांचा अंतर्भाव होतो.

### अपवाद

(१) स्पेशल मॅरेज ॲक्टाच्या २१ व्या कलमांतील तरतुदींमुळें इंडियन सक्सेशन ॲक्टान्वयें नियमन होणाऱ्या मालमत्तेचा वारसा. (२) माजी संस्थानाधिपतींनें भारत सरकारशीं केलेल्या करारांतील अगर हिंदु वारसा कायदा जारी होण्यापूर्वीच्या एखाद्या करारांतील शर्तीप्रमाणें एकाच वारसदाराकडे जाणारी मालमत्ता. (३) भारतांत आपलें राज्य विलीन करण्यापूर्वी कोचीनच्या महाराजांनीं कायद्यानें ज्यासाठी ट्रस्ट निर्माण केला होता, ती मालमत्ता.

### एकत्र कुटुंबाच्या मालमत्तेंतील वांटा

वरील अपवाद वगळतां या कायद्यांत, कायदेशीर मृत्युपत्र न करतां मरण पावलेल्या हिंदूच्या सर्व तऱ्हेच्या वारशासंबंधींचें नियमन करण्यांत आलें आहे. हिंदु पुरुषाच्या मालमत्तेंत स्वकष्टार्जित मालमत्तेचा अगर मिताक्षरा पद्धतीनें येणाऱ्या एकत्र कुटुंबाच्या मालमत्तेच्या वांट्याचा, रिक्थसंमेभागाचा, समावेश होतो.

### पहिले वारसदार

सदर कायद्याच्या परिशिष्टांत हिंदु पुरुषाचे वारसदार दोन वर्गांत नमूद करण्यांत आले आहेत. सदर हिंदु पुरुषाच्या मृत्यूनंतर त्याच्या मालमत्तेचें पहिले वारसदार म्हटले म्हणजे मुलगा, मुलगी, विधवा व आई असे चार भागीदार असून प्रत्येकाचा वांटा सारखाच राहील.

तथापि, मुलाचा वडिलांपूर्वीच मृत्यु झाला असल्यास, त्याची विधवा व त्याचे मुलगे व मुली यांस त्याचा हिस्सा सारखा वाटला जाईल. त्याचप्रमाणें वडिलांच्या मृत्यूपूर्वीच मुलगी मरण पावली असल्यास तिचा मुलगा व मुलगी यांस तिचा हिस्सा सारखा वाटला जाईल.

तसेंच उपरोक्त इसमाचा मुलगा व मुलाचा मुलगा त्याच्या मृत्यूपूर्वीच मरण पावले असल्यास अगोदर मरण पावलेल्या नातवाच्या विधवेस, तिच्या मुलास व मुलीस मरण पावलेल्या मुलाच्या वांटयाची मालमत्ता सारख्या प्रमाणांत वांटण्यांत येईल.

उपरोक्त तीन परिच्छेदांत उल्लेखिलेले सर्व वारसदार पहिल्या वर्गांत असून, त्यांची एकूण संख्या १२ आहे. तथापि नातू, नाती व पणतू यांचा संबंध त्यांचे आईबाप मृत झाल्यानंतरच येतो आणि त्यामुळें हे १२ प्रकारचे वारसदार एकाच वेळीं वारसदार होणें संभवनीय नाहीं

### दुसऱ्या वर्गातील वारसदार

पहिल्या वर्गांतील वारसदार न मिळाल्यास दुसऱ्या वर्गांतील माणसें वारसदार होतील तीं अशीं:—

१.—वडील.

२.—(१) मुलाच्या मुलीचा मुलगा (२) मुलाच्या मुलीची मुलगी
(३) भाऊ (४) बहीण

३.—(१) मुलीच्या मुलाचा मुलगा (२) मुलीच्या मुलाची मुलगी
(३) मुलीच्या मुलीचा मुलगा (४) मुलीच्या मुलीची मुलगी

४.—(१) भावाचा मुलगा (२) बहिणीचा मुलगा
(३) भावाची मुलगी (४) बहिणीची मुलगी

५.—(१) बापाचा बाप (२) बापाची आई

६.—(१) बापाची विधवा (२) भावाची विधवा

७.—(१) बापाचा भाऊ (२) बापाची बहीण

८.—(१) आईचे वडील (२) आईची आई

९.—(१) आईचा भाऊ (२) आईची बहीण.

या यादींत भाऊ व बहीण यांच्या निर्देशांत सहोदर (पण भिन्नपिता असलेल्या) भावाबहिणींचा समावेश करण्यांत आलेला नाहीं. दुसऱ्या वर्गांत नमूद केलेल्या वारसदारांपैकीं पहिल्या क्रमास दुसऱ्या अगोदर व दुसऱ्यास तिसऱ्या अगोदर याचप्रमाणें अग्रक्रम देण्यांत येतील. एकाच क्रमांतील वारसदारांस सारखाच हिस्सा मिळेल.

## विजेच्या भारी यंत्रसामुग्रीचा कारखाना

भोपाळ येथें विजेची भारी यंत्रसामुग्री तयार करण्याचा कारखाना काढण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. आतां कारखान्याची प्राथमिक तयारी करण्यांत येऊं लागली आहे. भोपाळ शहराच्या उत्तरेला ६ मैलांवर कारखान्याची जागा निश्चित करण्यांत आली आहे. जागा सुमारें तीन चौरस मैल असून ती लवकरच मध्यवर्ती सरकारच्या ताब्यांत घेण्यांत येईल. कारखान्याची पाणी व वीज ह्यांची जरूरी भागविण्याचें भोपाळच्या सरकारनें मान्य केलें आहे. मात्र हें काम टप्प्याटप्प्यानें पूर्ण करण्यांत येईल. कारखान्याला लागणारा कच्चा माल वाहून नेण्यासाठी आणि तेथें तयार होणारा पक्का माल ठिकठिकाणीं पाठविण्यासाठी वहातुकीची व्यवस्था करावी लागेल. दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांच्या कालांत अशा प्रकारची वहातूक वाढणार असल्यामुळें रेल्वे-बोर्डानें जरूर ती व्यवस्था करण्याकडे लक्ष देण्याचें ठरविलें आहे. कारखाना स्थापन करण्याचे कामीं असोशिएटेड इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लि. ह्या कंपनीचें सहकार्य मिळविण्यांत आलें आहे. ह्या कंपनीच्या अधिकारीवर्गाशीं तपशीलवार वाटाघाटी करण्यासाठी भारतीय तज्ज्ञांचें एक प्रतिनिधीमंडळ सध्यां ब्रिटनला गेलें आहे. कारखान्यासंबंधीचा संपूर्ण अहवाल ब्रिटिश कंपनीकडून येत्या नोव्हेंबर महिन्यापर्यंत भारतीय सरकारकडे येईल, अशी अपेक्षा आहे. कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादन करण्यास आणखी पांच वर्षे तरी लागतील. त्यानंतर ७ वर्षांच्या कालांत कारखान्याची संपूर्ण उत्पादनक्षमता उपयोगांत आणली जाईल. धरणें, रेल्वे, वीजकेंद्रें, इत्यादींसाठी लागणारीं अवजड यंत्रें कारखान्यांत तयार होतील.

## डायरेक्टरांचा मेहेनताना वाढविता येणार नाहीं

### नव्या कंपनीकायद्याचें ३१० वें कलम

नवीन कंपनीकायदा अंमलांत येण्याचे थोडे आधीं व मागून कित्येक कंपन्यांनीं आपलीं आर्टिकल्स ऑफ असोसिएशन बदलून किंवा अन्य मार्गानें बोर्ड ऑफ डायरेक्टर्सच्या सभेस हजर रहाण्याबद्दल डायरेक्टराला मिळावयाच्या मेहेनतान्यांत वाढ केली आहे. कोणत्याहि डायरेक्टराच्या मेहेनतान्यांत वाढ केली, तर त्याला ३१० वें कलम लागूं होतें. ह्या कलमान्वयें अशा वाढीला मध्यवर्ती सरकारनें मंजुरी दिली नाहीं, तर मेहेनताना वाढविणारी दुरुस्ती रद्द होते. मेमोरँडम, किंवा आर्टिकल्स बदलून, कोणत्याहि कराराचे अन्वयें, कंपनीच्या साधारण सभेंत ठराव करून किंवा बोर्डानें ठराव करून, कोणत्याहि प्रकारें मेहेनताना वाढवावयाचा म्हटला, तरी सरकार मंजुरी मिळविलीच पाहिजे.

## मुखत्यारपत्र व प्रतिज्ञित लेख ह्यांचे परिपूर्तीची सोय

(श्री. स. वा. दातार, वकील, पुणें)

मुखत्यारपत्रें (Powers of Attorney) व प्रतिज्ञित लेख (Affidavits) वगैरे दस्तऐवजांवर योग्य सरकारी अधिकाऱ्यांसमक्ष सह्या व्हाव्या लागतात. व त्याबद्दल त्या अधिकाऱ्यांच्या साक्षीसह्या त्या दस्तऐवजावर असाव्या लागतात. मॅजिस्ट्रेट ह्यांना अशा साक्षी घालण्याचा अधिकार असतो. परंतु ज्या मॅजिस्ट्रेटांपुढें फौजदारी खटल्याचें अगर अन्य सरकारी कामकाज चालतें, त्यांनीं अशा साक्षी घालूं नयेत असा संकेत आहे. कारण, जर ह्याबाबत कोर्टापुढें साक्षीला जाण्याचा प्रसंग आला तर अशा मॅजिस्ट्रेटांचे नित्याचे कामाचा खोळंबा होईल. म्हणून सरकारनें ह्या कामासाठी ऑनररी मॅजिस्ट्रेटांच्या नेमणुका केलेल्या आहेत व त्यांजकडून हें काम जनतेनें करून घ्यावें अशी सरकारची रास्त अपेक्षा आहे. पुणें शहर व खडकी ह्या विभागांत खालील ऑनररी मॅजिस्ट्रेट आहेत

(१) श्रीमती राधाबाई आपटे, १२६३।१ शिवाजीनगर, जंगलीमहाराज रोड, पुणें ५
(२) श्री. रामचंद्र सखाराम बडदे, ३८० नानापेठ पुणें २
(३) श्री. शंकरराव महादेव मेळके, १४१८ शुक्रवार, पुणें २
(४) श्री. अब्देअल्ली हैदरभाई, ६५५ रविवार, पुणें २
(५) श्री. धोंडिराम गुलाबचंद खिंवसरा, १४८५ शुक्रवार, पुणें २
(६) डॉ. ताराबाई विष्णु लिमये (जोगळेकर) ९२५ सदाशिव, पुणें २
(७) श्री. धरमदास शिवलदास लुल्ला, ९३ म. गांधी रोड, पुणें१
(८) श्री. गोविंद वासुदेव पटवर्धन ७५९।५० डेक्कन जिमखाना, पुणें ४
(९) श्री. शंकरलाल भिकमदास पोखरिया २०८ नानापेठ, पुणें २
(१०) श्री. टेकचंद गुलाबराज साधवाणी २४१ ईस्टस्ट्रीट, पुणें
(११) श्री. रामदास नथमल शेट ११८४।४ फ. कॉ. रोड पुणें ४
(१२) श्री. रमणलाल कांतीलाल शेट २६२ बुधवार पुणें २
(१३) श्री. बळवंत लक्ष्मण शेलार, स. नं ९५ मेंटल हॉस्पिटल जवळ, येरवडा.
(१४) श्री. नागलिंगम् श्रीनिवास मुदलियार, ३३४ रास्ता पेठ पुणें २
(१५) श्री. नथमल मूळचंद, नवाबाजार, महात्मा गांधी रोड, खडकी.
(१६) श्री. मोहनलाल चिमणलाल मणियार, १८२ शि. नगर पुणें ५
(१७) श्री. गोविंदराव विनायकराव मुदलियार, २६१ रास्ता, पुणें २
(१८) शंकरराव रामचंद्रराव पन्हाळे, ७५०।१२ भवानी पेठ, पुणें २

### डोमिसाइल सर्टिफिकिटस्

डोमिसाइल सर्टिफिकिटस् पुणें येथील कलेक्टर कचेरींतील हवेली रजिस्ट्रार ह्यांचे कचेरीशेजारी एक खास सब-डिव्हिजनल मॅजिस्ट्रेट ह्यांचे कोर्ट व कचेरी आहे त्यांजकडून मिळतात. त्यांचेकडे मुखत्यारपत्रें व प्रतिज्ञित लेख ह्यांचेंहि काम ११॥ ते १२ व ४॥ ते ६ ह्या वेळांत सुलभपणें होऊं शकतें.

वकील वर्ग व गरजू लोक ह्यांचे उपयोगासाठी मुद्दाम मिळवून ही माहिती प्रसिद्ध केली आहे.

## प्रजासत्ताक दिन व स्वातंत्र्यदिन

### ह्या दिवशीं पगारी सुट्टी दिलीच पाहिजे

लेबर अपेलेट ट्रायब्यूनल ऑफ कलकत्त्यानें धनबादच्या लोअर ट्रायब्यूनलचा निवाडा उचलून धरून, प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्यदिन हे पगारी रजेचे दिवस धरले पाहिजेत, असें ठरविलें. ह्या दोन दिवशीं ज्यांना काम करावें लागलें, त्यांची भरपाई करण्यांत यावी, असें लोअर ट्रायब्यूनलनें फर्मावलें होतें; त्यावरील अपील फेटाळतांना अपेलेट ट्रायब्यूनलनें खालच्या ट्रायब्यूनलचा निवाडा कायम केला.

कोळशाच्या खाणींतील काम सतत चालूं ठेवावें लागतें, फार सुट्टयांमुळें उत्पादनांत खंड पडतो; वरील दोन दिवशीं पगारी सुट्टी देण्याचें बंधन नव्हतें, प्रत्येक सुट्टीचा दिवस म्हणजे बंगाल आणि बिहारमधील खाणींना ७ लाख रुपयांचा भुर्दंड बसतो, ह्या सुट्टयांमुळें दर टन कोळशाचा उत्पादनखर्च एका आण्यानें वाढेल, इत्यादि मुद्दे खाणींमालकांनीं उपस्थित केले होते.

अपेलेट ट्रायब्यूनल निवाड्यांत म्हणतें: "हे दोन दिवस अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय सण आहेत. बाकीच्या सबंद देशांत ते पाळले जात असतांना, खाणींतच फक्त ते कां पाळले जाऊं नयेत? ह्या दिवशीं कामगारांना पूर्ण दरानें पगार व भत्ता मिळाला पाहिजे. ज्या कामगारांना त्या दिवशीं काम करावें लागलें, त्यांना ओव्हरटाइम दरानें पैसे देण्यांत आले पाहिजेत."

## मराठा चेंबरचें नवीन कार्यकारी मंडळ (१९५६-५७)

### शेठ पु. का. दिवेकर, अध्यक्ष

मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजच्या अध्यक्षपदीं सन १९५६-५७ सालासाठीं श्री. शेठ पु. का. दिवेकर (स्वस्तिक टेक्सटाईल मिल्स लि., मुंबई) यांची निवड झाली आहे. चेंबरच्या इतर पदाधिकाऱ्यांचीं नांवें पुढीलप्रमाणें:—

उपाध्यक्ष: (१) श्री. ग. रा. साठे (साठे बिस्किट अँड चॉकोलेट कंपनी, लि.) पुणें,
(२) श्री. शं. ल. किर्लोस्कर, पुणें,
(३) श्री. दा. वा. पोतदार, पुणें,
(४) श्री. शं. र. ठाकूर (ठाकूर सावदेकर आणि कं.), पुणें,

खजिनदार: श्री. श्री. श्री. मराठे (भारत पेन्सिल्स), पुणें,

कार्यवाह: (१) श्री. गो. द. आपटे, पुणें,
(२) श्री. आ. रा. भट, पुणें.

याखेरीज कार्यकारी मंडळावर १६ जणांची सदस्य म्हणून निवड झाली आहे.

### विमान चालविण्यासाठी सूर्यप्रकाशाचा उपयोग

विमानविषयक लिखाण करणाऱ्या लेखकांचा एक संघ सॅनफ्रॅन्सिस्को येथें आहे. ह्या संघाला सूर्याच्या प्रकाशाच्या शक्तीचा उपयोग करून भ्रमण करणाऱ्या विमानाचें मॉडेल दाखविण्यांत आलें. सूर्याच्या प्रकाशाचा उपयोग जळणासाठी करण्याचे प्रयोग सध्या चालू आहेत. सूर्यप्रकाशाचा रेडिओसाठी उपयोग करण्यांत यश मिळालेलें आहे.

**तुंगभद्रा धरणासाठी मदत**—तुंगभद्रा नदीवर बांधण्यांत यावयाच्या धरणाच्या व पाटबंधाऱ्याच्या कामास उपयोगी पडेल अशी ७५ टन वजनाची यंत्रसामुग्री ऑस्ट्रेलियानें पुरविली आहे. ही मदत कोलंबो योजनेप्रमाणें देण्यांत येत आहे. माती खणून बाजूला फेकण्याचें एक प्रचंड एंजिन ६० फूट उंचीचें आहे.

## शेतकरी कर्जनिवारण कायद्याची अंमलबजावणी

मुंबई शेतकरी कर्जनिवारण कायद्याची १९४७ पासून अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर १९५४–५५ साल अखेरीपर्यंत शेतकऱ्यांचीं ३०·९८ कोटी रुपयांचीं कर्जे कमी करण्यांत आलीं. यापैकी ९७·८४ लाख रुपयांचीं कर्जे १९५४–५५ सालीं कमी करण्यांत आलीं.

सदरहु कायद्याच्या कारभाराबाबतच्या वार्षिक अहवालाप्रमाणें १९५४–५५ सालीं १५,३२,८५७ कर्जदारांनीं आणि धनकोंनीं कर्जाबाबत तडजोडीसाठी डेट अॅडजेस्टमेंट बोर्डाकडे अथवा दिवाणी कोर्टाकडे अर्ज केले. हे अर्ज एकूण ८५·२० कोटी रुपयांसंबंधींचे होते. यापैकी ७५·१४ कोटी रुपयांसंबंधींचे एकूण १४,६४,८३३ अर्ज १९५४–५५ अखेरीपर्यंत निकालांत काढण्यांत आले. त्या सालीं ३·५९ कोटी रुपयांसंबंधींचे एकूण ३९,५३८ अर्ज निकालांत काढण्यांत आले व एकूण ९७·३५ लाख रुपये कर्ज कमी करण्यांत आलें.

शेतकरी कर्जनिवारण कायदा राज्यांत सर्वत्र लागू असून गरीब शेतकऱ्यांचीं भरमसाट कर्जे कमी करून तीं त्यांच्या कर्जफेडीच्या कुवतीच्या मर्यादेंत आणणें आणि सोप्या हप्त्यांनीं कर्जफेडीची व्यवस्था करून त्यांना पूर्णपणें कर्जमुक्त करणें हें या कायद्याचें उद्दिष्ट आहे. या कायद्याचा कारभार दिवाणी कोर्टाकडे सोंपविण्यांत आला असून सहकारी खातें शेतकऱ्यांमध्यें या कायद्याच्या तरतुदींबाबत प्रचार करतें. तसेंच कर्जदारांच्या कर्जफेडीची कुवत ठरविण्याच्या बाबतींतहि सहकारी खातें कोर्टांना सर्वसाधारण मदत आणि मार्गदर्शन करतें व ज्यांच्या कर्जाबाबत तडजोड झाली असेल अशा शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीसाठी पैसा मिळेल आणि त्याची परतफेड नियमितपणें होईल, अशी दक्षता घेतें.

### शेतकऱ्यांना कर्जपुरवठा

ज्या शेतकऱ्यांच्या कर्जाबाबत तडजोडीचें काम चालूं असेल अथवा ज्यांच्या बाबतींत निवाडा झाला असेल, त्यांना सहकारी सोसायट्यांमार्फत कर्ज देऊन पिकांच्या लागवडीसाठी अथवा हंगामासाठी पैसा पुरविणें हें सरकारचें धोरण आहे. अहवालाच्या वर्षीं सहकारी सोसायट्यांनीं शेतकऱ्यांना अशीं ९७·४५ लाख रुपयांचीं कर्जे दिलीं. १९१ शेतकी पतपेढ्या, बचत आणि पतपेढ्या, ४३५ विविध कार्यकारी सोसायट्या व १९ विक्रीसंस्था नव्यानें नोंदविण्यांत आल्या.

याशिवाय आणखी तीन मार्गांनीं शेतकऱ्यांना पिकांच्या लागवडीसाठी पैसा मिळतो. तगाई कर्जे, धान्य डेपो आणि अधिकृत सावकार हे ते तीन मार्ग होत. तथापि, या कायद्याखालीं शेतकऱ्यांना शक्यतों सहकारी सोसायट्यांमार्फतच पैसा पुरविण्याचें सरकारचें धोरण असल्यामुळें उपर्युक्त तीन मार्गांनीं होणारी मदत फार नसते. अहवालाच्या सालीं तगाई कर्जे आणि धान्य डेपोमार्फत एकूण १,४८,८८८ रुपयांचीं आणि अधिकृत सावकारांमार्फत एकूण ७,००,४७५ रुपयांचीं कर्जे देण्यांत आलीं. तगाई कर्जे आणि धान्य डेपोमार्फत देण्यांत येणारी कर्जे कमी झालीं आहेत. कारण, सहकारी सोसायट्यांनीं याबाबतच्या शेतकऱ्यांच्या गरजा भागविल्यामुळें त्यांनीं तगाई कर्जासाठी अर्ज केले नाहींत.


भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:–भोर, जि. पुणें.

शाखा:–पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७७,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:–बुधवार प. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा:—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर ( तांबट ) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी ( अध्यक्ष )
श्री. का. म. महाजन ( उपाध्यक्ष )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्हें | रु. १,१४,००० |

एकूण खेळतें भांडवल रु. ६०,००,०००चे वर

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.